# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.06.2025** **वारःसोमवार**

---

•तीन देशांच्या दौऱ्यादरम्यान पंतप्रधानांची सायप्रसमधील व्यावसायिकांबरोबर चर्चा
•पुण्यातील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून चार जणांचा मृत्यू आणि 51 जण जखमी
•केदारनाथमधील अपघातानंतर हेलिकॉप्टर व्यवस्थापनासाठी नागरी उड्डाण मंत्रालयाने केले कडक सुरक्षा नियम लागू
•इस्त्रायल मधील भारतीय दुतावासाकडून तिथल्या भारतीय समुदायासाठी मार्गदर्शक सुचना जारी
•देशाच्या पश्चिम किनारपट्टीनजिक लाल बावटा जारी तर हरियाणा, पंजाब आणि गुजरातमध्ये पुढील दोन दिवस जोरदार वारे आणि पावसाचा इशारा

**<u>पंतप्रधानपूल</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी काल पासून पाच दिवसांच्या सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर आहेत. सायप्रस मध्ये गेल्या 23 वर्षातील भारताच्या पंतप्रधानांची ही पहिली भेट आहे. आज ते सायप्रसचे राष्ट्रपती निकोस क्रिस्तोदोलीदीस यांची भेट घेणार आहेत. त्यांनी लिमासोलमध्ये व्यापार विषयक परिषदेत सहभाग घेतला आणि उपस्थितांना संबोधित केलं. युरोपचं प्रवेशद्वार अशी सायप्रसची भारतात ओळख असून उभय देशात सध्या दीडशे दशलक्ष डॉलर इतका द्विपक्षीय व्यापार सुरू आहे, परंतु भारत सायप्रस यांच्यातील आर्थिक भागीदारीची क्षमता याहून खूप जास्त आहे असं मोदी यांनी सांगितलं. सागरी आणि बंदरे विकास, जहाज बांधणी, नागरी हवाई वाहतुक यासारख्या क्षेत्रांवर भारत लक्ष केंद्रित करत असून अशा उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी नवनवीन धोरणे आखत असल्याची माहिती त्यांनी दिली.

भारताची व्यापारासंदर्भातील स्पष्ट धोरणे आणि स्थिर राजकीय वातावरणामुळे आम्ही आता 'व्यवसाय करण्यासाठी सुलभतेबरोबरच 'व्यवसाय करण्यासाठी विश्वासार्हता यावर लक्ष केंद्रित करत आहोत असं प्रतिपादन त्यांनी केलं. गेल्या दहा वर्षांत, भारत डिजिटल क्रांतीचं एक जागतिक उदाहरण म्हणून जगासमोर आला आहे. जगात होणाऱ्या एकंदर डिजिटल व्यवहारांमधील 50 टक्के व्यवहार आता भारतात यू. पी. आय. द्वारे होतात असंही त्यांनी सांगितलं. सायप्रसला यू.पी.आय नेटवर्कमध्ये आणण्यासाठी सुरू असलेल्या चर्चांचं त्यांनी स्वागत केलं. भारतातील विविध स्तरावर सुरु असलेल्या अभियानांची त्यांनी

यावेळी  माहिती दिली. सायप्रस शेअर बाजार आणि भारताच्या राष्ट्रीय शेअर बाजार यांच्यातील सहकार्य करार हे एक महत्वाचं पाऊल असल्याचं मोदी म्हणाले.

भारत भविष्यातील पायाभूत सुविधांमध्ये वार्षिक 100 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक करत आहे आणि जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेनं वेगाने प्रगती करत आहे असं त्यांनी सांगितलं. भारत-सायप्रस-ग्रीस व्यवसाय आणि गुंतवणूक समिती हा एक अतिशय स्वागतार्ह उपक्रम असून सखोल आर्थिक सहकार्यासाठी हे एक महत्त्वाचं व्यासपीठ ठरेल असं ते म्हणाले.

दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्या निमंत्रणावरून मोदी आज कॅनडाच्या कानानास्किस इथं जी-सेवन परिषदेत सहभागी होणार आहेत. शेवटच्या टप्प्यात 18 जून ला पंतप्रधान क्रोएशियाला भेट देतील.

**<u>जनगणना</u>**

आगामी जनगणनेची प्रक्रिया सुलभ होण्याच्या उद्देशानं तयारीचा आढावा घेण्यासाठी गृहमंत्री अमित शहा यांनी काल गृह विभागाचे सचिव आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर नवी दिल्लीत बैठक घेतली. जनगणनेची अधिसूचना आज जारी होईल अशी माहिती अमित शहा यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत दिली आहे. देशभरांत ३४ लाख प्रगणक आणि निरीक्षक एक लाख ३ हजारांहून अधिक अधिकारी आधुनिक माबाईल डिजीटल प्रणालीद्वारे या प्रक्रियेत सहभागी होतील. अशी माहिती शहा यांनी यावेळी दिली.

दोन टप्प्यात पार पडणाऱ्या या प्रक्रियेत पहिल्या टप्प्यात प्रत्येक घराची परिस्थिती, मालमत्ता, सोयीसुविधा यांची माहिती घेतली जाईल तर दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक व्यक्तीची गणना, लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक तसंच इतर तपशीलाची नोंद केली जाईल. त्यानंतरची जनगणना मोबाइल तंत्राचा वापर करून डिजिटल माध्यमांद्वारे केली जाईल. नागरिकांना स्व-गणनेची तरतूद देखील उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**<u>धनखड</u>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आजपासून तीन दिवसांच्या पुदूचेरीच्या दौऱ्यावर आहेत. JIPMER संस्थेच्या एपीजे अब्दुल कलाम सभागृहात 'पर्यावरणीय शाश्वततेचं राष्ट्र निर्माणामधील महत्व' या विशेष कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून ते उपस्थित राहणार आहेत. यानंतर ते विद्यार्थी आणि संस्थेच्या कर्मचाऱ्यांबरोबर संवादात्मक सत्रात भाग घेणार असून पर्यावरणीय जागरूकता वाढवण्यासाठी  'एक पेड़ माँ के नाम' या उपक्रमा अंतर्गत धनखड वृक्षारोपण करतील. उद्या ते पुदूचेरी विद्यापीठाला भेट देणार असून शिक्षक, विद्यार्थी आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांबरोबर एका सत्रात सहभागी होतील.

**<u>इस्त्रायल-इराण-दुतावास</u>**

पश्चिम आशियातील इस्त्रायल- इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इस्त्रायल मधील भारतीय दुतावासानं तिथल्या भारतीय समुदायासाठी मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत. तेल अवीव इथला दुतावास

इस्त्रायलमध्ये काम करणारे कर्मचारी, विद्यार्थी, व्यावसायिक आणि पर्यटकांच्या संपर्कात असून या सर्वांच्या सुरक्षेसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. तसंच भारतीय अधिकारी इस्रायली यंत्रणेशी नियमित संपर्कात असल्याचं दुतावासानं समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. इराणमधील तेहरानस्थित भारतीय दूतावास इराणमधील भारतीय विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांना इराणमधील सुरक्षित ठिकाणी दूतावासाच्या सोयीनुसार स्थलांतरित केले जात आहे. अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनाद्वारे दिली आहे.

**<u>पूलकोसळला</u>**

पुण्यातील मावळमध्ये कुंडमळा इथं काल दुपारी इंद्रायणी नदीवरील लोखंडी पूल कोसळल्यानं चार पर्यटकांचा मृत्यू झाला असून, 51 पर्यटक जखमी झाले आहेत. रविवारचा सुट्टीचा दिवस असल्यानं काल इथं पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती. प्रमाणापेक्षा अधिक संख्येनं पर्यटक या पूलावर असल्यानं तो कोसळल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं असून, या दुर्घटनेमागील कारणांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे. या अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारनं पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी घटनास्थळी भेट देऊन बचाव कार्याचा आढावा घेतला. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं असून, घटनेची माहिती घेऊन राज्य सरकारला आवश्यक ती मदत देण्याचं आश्वासन दिलं.

**<u>केदारनाथअपघात</u>**

उत्तराखंडमध्ये केदारनाथ परिसरात असलेल्या गौरीकुंड खार्क या डोंगराळ भागात काल  सकाळी एक हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या अपघातात सहा यात्रेकरू आणि पायलटसह सात जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये यवतमाळच्या वणी इथल्या जयस्वाल कुटुंबातल्या तीन जणांचा समावेश आहे. हे हेलिकॉप्टर केदारनाथहून गुप्तकाशीला जात होतं. घटनेची माहिती मिळताच, बचाव पथकं घटनास्थळी रवाना झाली आणि मदत आणि बचाव कार्याला सुरूवात झआली. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. 'विमान अपघात तपास विभाग' या अपघाताची चौकशी करणार आहे. चौकशीनंतर हेलिकॉप्टर सेवा पुन्हा सुरू केली जाईल, असं धामी यांनी सांगितलं.

**<u>अहमदाबादविमान अपघात</u>**

अहमदाबाद इथं झालेल्या विमान अपघातातील विमानामधील ब्लॅक बॉक्स सापडला असल्याचं अपघाताची चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यानी सांगितलं आहे. यामुळे आता अपघाताची कारणं सापडण्यास मदत होईल. या अपघातात 270 जणांचा मृत्यू झाला आहे. यापूर्वी फक्त फ्लाइट डेटा रेकॉर्डर सापडला होता.  पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मुख्य सचिव पी के मिश्रा यांनी ब्लॅक बॉक्स मिळाला असल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.  त्यांनी काल अपघात स्थळी आणि जखमी व्यक्ती उपचार घेत असलेल्या स्थानिक रुग्णालयाला भेट दिली. मिश्रा यांनी अहमदाबादमधील सर्किट हाऊस मध्ये उच्चस्तरीय आढावा बैठक घेतली आणि केंद्र

आणि राज्य सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर मदत, बचाव कार्य आणि चौकशी या विषयांवर चर्चा केली.

**<u>मुष्टियोद्धा</u>**

भारतीय मुष्टियोद्धा निशांत देवने न्यू यॉर्कमधील मॅडिसन स्क्वेअरगार्डन इथं झालेल्या सुपर वेल्टरवेट लढतीत जोसु सिल्वाचा ६०-५४ असा पराभव करून त्याची कारकिर्दीतील दुसरी लढत जिंकली. या २४ वर्षीय खेळाडूने या वर्षी जानेवारीमध्ये झालेल्या पदार्पणाच्या सामन्यात अल्टोन विगिन्सविरुद्ध विजय मिळवला होता.

हवामान

देशाच्या पश्चिम किनारपट्टीनजिक आज जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. दिल्ली, हरियाणा, पंजाब आणि गुजरातमध्ये पुढील दोन दिवस जोरदार वारे आणि पाऊस पडेल. वायव्येकडील राज्य आणि दिल्लीतील तापमानात काल घट नोंदवली गेली. मान्सूनचा प्रवास प्रगतीपथावर नसला तरी कोकण, गोवा आणि कर्नाटकच्या किनारपट्टी परिसरांत जोरदार पाऊस पडत आहे.अशी माहिती हवामान विभागाचे ज्येष्ठ वैज्ञानिक आर के जेनामणी यांनी आकाशवाणीला दिली.

**<u>केरळ-पाऊस</u>**

केरळमध्ये सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे राज्याच्या उत्तरेकडील भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. अतिमुसळधार पावसाच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर ११ जिल्ह्यातील शाळांना आज सुटी जाहीर केली आहे. रात्रीचा प्रवास करणारे प्रवासी आणि डोंगराळ भागातील पर्यटकांसाठी सुरक्षेसाठीचे निर्बंध जारी करण्यात आले आहेत. गुरुवारपर्यंत केरळ-कर्नाटक-लक्षद्विप किनारपट्टीलगत मासेमारी न करण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार